**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शनिवार दिनांक १० ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलकांची दिल्लीत धरपकड.**
2. **महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.**
3. **दुष्काळ परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथक यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांच्या बांधावर.**
4. **राज्यातल्या काही भागांत १२ ऑक्टोबरपर्यंत उष्णतेची लाट येण्याचा इशारा, विदर्भात पारा ४० अंशाच्या आसपास.**

----------------------------------

जंतरमंतर आंदोलन

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतरमंतरवर आंदोलन करण्यासाठी निघालेल्या अनेक आंदोलक आणि राजकीय नेत्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं. कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके, सौरव दास आणि आशुतोष रांका तसंच यू ट्यूबर ध्रुव राठी यांना पकडून त्यांची चौकशी करण्यात येत आहे. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी, माकपाचे नेते पिनराई विजयन, सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव,प्रशांत भूषण, नेहा बोरा यांच्यासह इतरांना ताब्यात घेण्यात आलं. सुरक्षेच्या कारणास्तव आणि प्रशासनिक कारणांसाठी पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारली होती. संपूर्ण दिल्लीत पोलीस आणि निमलष्करी दलांचे मिळून सुमारे २५ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ४५ मेट्रो स्थानकांमध्ये प्रवेशावर निर्बंध लावले आहेत. दिल्लीच्या सीमा, रेल्वेस्थानकं, बस स्थानकांसह इतर संवेदनशील ठिकाणांवर गस्त वाढवण्यात आली आहे. जंतरमंतर परिसरात इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद आहे. तसंच दिल्लीला जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्याही रद्द करण्यात आल्या आहेत. दरम्यान, दिल्लीत आकाशवाणी भवनाजवळ पोलिसांवर झालेल्या दगडफेकीत २ पोलीस जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. दिल्लीतल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईच्या ऑगस्ट

क्रांती मैदानातही आज आंदोलन होत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी यांच्यासह इतरांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं.

-----------------------------------

शरदचंद्र पवार टीका

दिल्लीत शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांवर पोलीस कारवाई करणं हा सरकारचा भेकडपणा असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. सरकारनं निर्बंध लादण्याऐवजी आंदोलकांशी संवाद साधावा, असंही त्यांनी सुचवलं. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. शांततापूर्ण आंदोलनं दाबण्यासाठी सरकार हुकुमशाही मार्गांचा अवलंब करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

-----------------------------------

भाजपा टीका

परकीय शक्तींच्या पाठिंब्याने घटनात्मक संस्था कमकुवत करण्याचा आणि नागरिकांचा लोकशाहीवरचा विश्वास तोडण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोप केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी दिल्लीत विरोधी पक्ष आणि इतर संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनासंदर्भात ते वार्ताहरांशी बोलत होते. देशात अस्थिरता निर्माण करण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याची टीका भाजपाचे अध्यक्ष नितिन नबीन यांनी वार्ताहर परिषदेत केली. भारताची लोकशाही ही अतिशय कणखर असून हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी देशवासी एकत्र येतील, अशा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधी पक्षांनी या रस्त्यावरच्या आंदोलनात विनाकारण राष्ट्रपतींना ओढलं असल्याची टीका भाजपा प्रवक्ते संबित पात्रा यांनी केली आहे.

-----------------------------------

सेवा संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं होत आहे. या अंतर्गत विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत कडुलिंबाचे लेपन असलेल्या उपयुक्त युरिया बाबत....

***(व्हॉइस कास्ट - धैर्यशील)***

*शेतकऱ्यांना अनुदानित दरात मिळणाऱ्या युरियाचा औद्योगिक वापरासाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी केंद्र सरकारने सप्टेंबर २०१५ मध्ये देशात उत्पादित होणाऱ्या सर्व युरियाला कडुलिंबाचे लेपन करणे अनिवार्य केले. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये आयात केलेल्या युरियासाठीही हा नियम लागू करण्यात आला. यामुळे युरियाचा औद्योगिक वापरासाठी होणारा वळव रोखण्यास मदत झाली. तसेच, नीममुळे जमिनीत नायट्रोजन हळूहळू मुक्त होतो आणि पिकांकडून त्याचे शोषण अधिक प्रभावीपणे होते. या उपाययोजनेमुळे सरकारची सुमारे १० हजार कोटी रुपयांची बचत झाल्याचा अंदाज आहे. भाताच्या उत्पादनात ५ पूर्णांक ७९ शतांश टक्के, मक्यामध्ये ७ पूर्णांक १४ शतांश टक्के, सोयाबीनमध्ये ७ पूर्णांक ४ दशांश टक्के, तुरीमध्ये १६ पूर्णांक ८८ शतांश टक्के, तर उसाच्या उत्पादनात १७ पूर्णांक ५ दशांश टक्के वाढ नोंदवण्यात आली. कडुलिंबाचे लेपनाच्या एका उपायाने युरियाचा गैरवापर रोखण्याबरोबरच सरकारी तिजोरीची बचत आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीलाही हातभार लावला.*

---------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे समन्वयाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबईतील वर्षा निवासस्थानी आज जलसंधारणविषयक बैठकीत ते बोलत होते. यंदा वॉटरकप अभियान लवकर सुरू होत असून, ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या संकल्पनेला प्राधान्य देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. पहिला पाऊस पडण्यापूर्वी जलसंधारणाच्या संरचना सज्ज ठेवून भूजलपातळी वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणांनी स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने कामांना गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. अभिनेते आमिर खान यांनी जलसंवर्धनासाठी लोकसहभाग वाढविण्याची गरज व्यक्त केली. जानेवारी ते मे या कालावधीत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण आणि जनजागृती उपक्रम राबवून पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---------------------------------

दुष्काळ पाहणी

यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथक आज शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले. या दौऱ्यात केंद्रीय पथकाने पिकांची स्थिती, पीक नुकसानीची पाहणी केली. यवतमाळ

तालुक्यातील मडकोना, लासिना, नेर तालुक्यातील लोणी मांडवगड, वटफळी, दोनड येथील पीक परिस्थितीची पाहणी करून या पथकाने शेतकऱ्यांसोबत संवाद साधला .केंद्रीय पथकाने कीटा कापरा येथील गौरक्षण संस्थेला भेट दिली व चारा उपलब्धतेबाबत विचारपूस केली. त्याचप्रमाणे लासीना येथील लघू सिंचन प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी केंद्रीय पथकातील अधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकारी विकास मीना व अन्य विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

---------------------------------

जलप्रकल्पांचा आढावा

बुलढाणा संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.प्रवीणकुमार देवरे यांनी नुकतीच जिल्ह्यातल्या जलप्रकल्पांचा आढावा दौरा केला. मेहकर तालुक्यातल्या कोराडी मध्यम प्रकल्प आणि संग्रामपूर तालुक्यातल्या चोंढी प्रकल्पातल्या पाणी साठ्याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पाणीवापराच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांना निर्देश दिले. पाहणीदरम्यान डॉ.देवरे यांनी स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. कमी पावसामुळे शेती संकटात असल्याचे सांगत शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी केली. पिण्याच्या पाण्याची गरज आणि शेतीची मागणी यांचा समतोल राखून लवकरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असं जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं.

---------------------------------

सुधाकर कोहळे

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अनिल सोले हे आपले गुरू आणि ज्येष्ठ नेते असून, त्यांच्या भूमिकेवर अधिक भाष्य करणे योग्य नसल्याचे कोहळे यांनी सांगितले. २०२५ पासून पदवीधर मतदार नोंदणी आणि मतदारांशी संपर्कावर भर दिल्याचे सांगत त्यांनी विजयाचा विश्वास व्यक्त केला. अनिल सोले यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्याचा दावाही कोहळे यांनी केला. दरम्यान काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजित वंजारी यांनी आज गोंदिया जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात मुरदोली, देवरी आणि अर्जुनी-मोरगाव इथं विविध बैठका घेऊन शिक्षक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला. शिक्षकांच्या समस्या, पदवीधरांचे प्रश्न, संघटनात्मक बांधणी आणि निवडणुकीच्या नियोजनावर यावेळी चर्चा करण्यात आली.

---------------------------------

नितीन देशमुख वक्तव्य

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याबद्दल आमदार नितीन देशमुख यांनी केलेल्या कथित वक्तव्याविरोधात अकोला इथं भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. माजी आमदार बळीराम सिरस्कार यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आणि सिव्हिल लाईन्स पोलिसांना निवेदन देत आमदार देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

-----------------------------------

विकल्प शुक्ला

आकाशवाणी रायपूरचे उपसंचालक आणि भारतीय माहिती सेवेच्या 1993 च्या तुकडीतील अधिकारी विकल्प शुक्ला यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या 58 व्या वर्षी निधन झाले. त्यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, दूरदर्शन आणि आकाशवाणी इथं विविध पदांवर काम केले. दिल्ली आणि भोपाळ इथं सेवा बजावल्यानंतर त्यांनी गेली 25 वर्षे रायपूरमध्ये काम केले. त्यांच्या निधनाने छत्तीसगडमधील माध्यम क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

-----------------------------------

हवामान

राज्याच्या इतर भागांसाह विदर्भात उन्हाचा तडाखा वाढला आहे. राज्यातल्या काही भागांत १२ ऑक्टोबरपर्यंत उष्णतेची लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. अनेक शहरांमधलं  तापमान ३७ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून, ऑक्टोबर हिटमुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विदर्भात उन्हाचा कडाका वाढला असून नागपूरमध्ये ३६ अंश तर अमरावती आणि अकोला जिल्ह्यात ४० अंश सेल्सिअस च्या आसपास तापमानाची नोंद झाली आहे.

-----------------------------------

तिसरा टी-२०

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना इंदोर इथं उद्या संध्याकाळी सात वाजता होणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतल्या आतापर्यंत झालेल्या दोन सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिजनं प्रत्येकी एक विजय मिळवत बरोबरी साधली आहे. भारतानं पहिला सामना जिंकल्यावर काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं विजयासाठी दिलेल्या २५० धावांच्या मोठ्या आव्हानाचा

पाठलाग करत वेस्ट इंडिजनं हा सामना जिंकला. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप यानं ४५ चेंडूत १०२ धावा  करत वेस्ट इंडिजच्या विजयात महत्वपूर्ण योगदान दिलं.

----------------------------------

विशेष रेल्वे

धम्मचक्र प्रवर्तन दिन २०२६ निमित्त नागपुरात होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे पुणे, नाशिकरोड, मुंबई, अकोला, भुसावळ आणि सोलापूर मार्गांवर विशेष रेल्वेगाड्या चालविण्यात येणार आहेत. या गाड्यांच्या माध्यमातून प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहेत. नागपूर आणि अजनी रेल्वेस्थानकांवर होल्डिंग एरिया, अतिरिक्त तिकीट सुविधा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत आणि रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात येणार आहे. गर्दीचे नियोजन आणि सुरक्षिततेसाठी अतिरिक्त रेल्वे सुरक्षा जवान, सीसीटीव्ही कॅमेरे आणि मदत कक्ष उभारण्यात येणार आहेत. गर्दी नियंत्रणासाठी दोन्ही स्थानकांवरील कार पार्किंग आणि फलाट तिकीट विक्री बंद ठेवण्यात येणार आहे. प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन आगाऊ करून रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

----------------------------------